निवडक

विश्वकर्मा विठ्ठल कालिका मंदिरात आज मातृ पितृ पूजन

टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. १३ : कोलवाळ येथील विश्वकर्मा विठ्ठल कालिका मंदिरात उद्या शुक्रवार, दि. १४ रोजी संध्याकाळी सात वाजता मातृ पितृ पूजनाचा कार्यक्रम होणार आहे. पालकांनी आपल्या मुलांसमवेत संध्याकाळी सहा वाजता उपस्थित राहावे. यावेळी मुल मुली आपल्या मातृ व पितृ यांची पूजा करणार आहेत. संध्याकाळी ५ ते ७ वाजता या वेळेत हा कार्यक्रम होईल.

साई सेवा आश्रम साई मूर्ती प्रतिष्ठापनेचा आज वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. १३ : केरी-सत्तरी येथील ओम साई सेवा आश्रम साई मूर्ती प्रतिष्ठापनेचा ११ वा वर्धापनदिन सोहळा शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी काकड आरती,साई पूजा व धार्मिक कार्यक्रम, दुपारी १२.३० वा साई महाआरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद,संध्या. ६ वा. गुरुदास गावकर व साथी कलाकारांतर्फे भजनाचा कार्यक्रम,रात्री ८ वा.साई महाआरती व तीर्थप्रसाद होणार आहे.सोहळ्याचे यजमान सौ. व श्री. विनोद नामदेव सावंत(मोर्ले सत्तरी) हे आहेत. सर्व साई भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

हणखणेच्या भराडी देवस्थानचा १६ पासून वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १३ : हणखणे येथील श्री देवी भराडी देवस्थानचा वर्धापनदिन दि. १६ ते १८ फेब्रुवारी दरम्यान विविध कार्यक्रमांनिशी साजरा होणार आहे. दि. १६ रोजी सकाळी ८ वाजता धार्मिक विधी, आरती, तीर्थप्रसाद, रात्री ८.३० वा तरुण हौशी नाट्यमंडळ हणखणे प्रस्तुत शंभूराजे नाटक होईल. या नाटकात गीताली मातोंडकर, अंकिता पावसकर, रामा नाईक, विकास गवस, ब्रिजेश नाईक, गौरेश नाईक, यशवंतराव देसाई, मनीष नाईक, प्रसाद गवस, प्रसाद गवस, संदीप वरक, संतोष वरक, गौरेश नाईक, मुकेश नाईक, चेतन तळवणेकर, विघ्नेश गवस, विकल वालम, श्रेयस नाईक, प्रत्यूष नाईक, प्रद्युत नाईक, आदर्श नाईक, साहिल नाईक ,आनंद नाईक, संकेत नाईक, सानिका नाईक यांनी भाग घेतला आहे. दि. १७ रोजी सकाळी ८ पासून धार्मिक विधी दुपारी आरती, महाप्रसाद होईल. रात्री ९ वा श्री भराडी देवी नाट्यमंच प्रस्तुत धनुर्भंग पौराणिक नाटक सादर होईल. या नाटकात भिकाजी नाईक, वामन नाईक, बबली नाईक, प्रदीप नाईक, विठ्ठल नाईक, संकेत नाईक, गोपीनाथ नाईक, रामा नाईक, विघ्नेश नाईक, प्रकाश नाईक, सिद्धेश नाईक, अर्जुन नाईक, पांडुरंग नाईक, आनंद नाईक, मनीष नाईक, मालिनी परब, श्रद्धा नाईक, प्रसाद गवस, धर्मा नाइक ,सौरंगी नाईक, शुभ्र नाईक आदींनी भाग घेतला आहे. संगीत दिग्दर्शक विश्राम विश्वास मेस्त्री , अर्जुन अरुंदेकर (तबला), सुभाष शिरोडकर (ध्वनी), जवाहर बर्वे (पार्श्व संगीत), अरुण नाईक (सहाय्यक), गुरुप्रसाद रंगमंच कासारपाल आदी बाजू सांभाळणार आहेत. दि. १८ फेब्रुवारी सकाळी ११.३० वा देवीचा कौलप्रसाद संध्याकाळी ४ वा श्री देवीची गावात पालखी मिरवणूक व रात्री पालखी आल्यावर मंदिर परिक्रमेने उत्सवाची सांगता होईल.

महिला आयपीएलचा आजपासून थरार

मुंबई, दि. १३ : महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) चे पहिले दोन हंगाम यशस्वीरित्या पार पडल्यानंतर, आता तिसरा हंगाम १४ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. ज्यामध्ये यावेळी देशातील चार शहरांमध्ये स्पर्धेचे सामने खेळवले जातील. डब्ल्यूपीएलमध्ये एकूण ५ संघ सहभागी होतात. उद्या सलामीला गुजरात जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यात होईल. सामन्याला ७.३० वाजता प्रारंभ होणार असून वडोदरा - कोटाम्बी स्टेडियमवर हा शुभारंभी सामना रंगणार आहे.

डब्ल्यूपीएलच्या पहिल्या हंगामात, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्स संघाने या स्पर्धेची ट्रॉफी जिंकली होती, तर दुसऱ्या म्हणजेच गेल्या हंगामात, स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू महिला संघाने जेतेपद जिंकण्यात यश मिळवले होते. यावेळी, डब्ल्यूपीएल २०२५ चा पहिला सामना १४ फेब्रुवारी रोजी खेळला जाईल, तर अंतिम सामना १५ मार्च रोजी खेळला जाईल.

महिला प्रीमियर लीग २०२५ चे सामने देशातील चार शहरांमध्ये खेळवले जातील, हे पहिल्यांदाच घडणार आहे. या स्पर्धेचा पहिला टप्पा वडोदरा येथे सुरूवात होणार आहे. त्यानंतर दुसरा टप्पा बंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होईल. पुढील टप्पा प्रथमच यावेळी लखनऊमधील एकाना स्टेडियमवरही खेळवले जातील. अंतिम टप्पा मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर खेळला जाईल.

डब्ल्यूपीएलमध्ये एकूण ५ संघ खेळतात, ज्यात गुजरात जायंट्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स आणि यूपी वॉरियर्स यांचा समावेश आहे. लीग टप्प्यात, सर्व संघांना एकमेकांविरुद्ध किमान २ सामने खेळण्याची संधी मिळेल, ज्यामध्ये पॉइंट टेबलमध्ये पहिल्या स्थानावर असलेला संघ थेट अंतिम सामन्यासाठी पात्र ठरेल, तर एलिमिनेटर सामना दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर असलेल्या संघांमध्ये खेळला जाईल.

रजत पाटीदार आरसीबीचा कर्णधार

मुंबई, दि. १३ : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाने आयपीएल २०२५ च्या नव्या हंगामासाठी आपल्या नव्या कर्णधाराची घोषणा केली आहे. गत हंगामात फाफ ड्युप्लेसी आरसीबी संघाचे नेतृत्व करताना दिसला होता. तो ताफ्यातून 'आउट' झाल्यावर या संघाची धूरा कुणाच्या खांद्यावर पडणार असा प्रश्न चांगलाच चर्चित होता. आरसीबीच्या संघानं अखेर याचं उत्तर दिले आहे. रजत पाटीदार याला आरसीबी संघाचा नवा कर्णधार करण्यात आले आहे. देशांतर्गत टी-२० क्रिकेटमध्ये रजत पाटीदार याने १६ सामन्यात कॅप्टन्सी केली असून ७५ विनिंग पर्सेंटसह त्याने १२ मॅचेस जिंकल्या आहेत. बॅटिंगमधील खास कामगिरीसह तो आता आयपीएलमध्ये कॅप्टन्सीची अतिरिक्त जबाबदारी पार पाडताना दिसणार आहे. २००८ च्या हंगामापासून आरसीबीचा संघ आयपीएल स्पर्धेत खेळताना दिसते. पण अद्याप त्यांना एकदाही जेतेपद पटकवता आलेले नाही. आता ३१ वर्षी रजतच्या कॅप्टन्सीत आरसीबीला सोनेरी दिवस येणार का? ते पाहण्याजोगे असेल.

दक्षिण आफ्रिकेच्या फाफ ड्युप्लेसी याने २०२२ ते २०२४ या कालावधीत आरसीबी संघाचे नेतृत्व केले होते. मेगा लिलावाआधी रंगलेल्या रिटेन रिलीजच्या खेळात आरसीबीने त्याला नारळ दिला होता. त्यानंतर फाफ मेगा लिलावात उतरला, पण आरसीबीने त्याच्यात रस दाखवला नाही. तो दिल्लीचा झाला अन् २०२५ च्या हंगामात आरसीबी नव्या कॅप्टनसह मैदानात उतरणार हे स्पष्ट झाले. पुन्हा विराट कोहली या फ्रँचायझी संघाचे नेतृत्व करताना दिसेल, अशी चर्चा रंगली होती. पण ती फोल ठरली. विराट कोहली स्वत: कॅप्टन्सीसाठी तयार नाही. त्यामुळे अखेर दिर्घकालीन विचार करुन आरसीबीनं ३१ वर्षीय रजत पाटीदारवर मोठी जबाबदारी सोपवली आहे.

स्पोर्ट्स बल्कावने जिंकली आंतर प्रसारमाध्यम फुटसाल स्पर्धा

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १३ : स्पोर्ट्स बल्कावने अंतिम सामन्यात प्रुडंट मीडियाचा ३-० असा पराभव करीत गोवा क्रीडा पत्रकार संघटना (एसजेएजी) आयोजित आंतर प्रसारमाध्यम फुटसाल स्पर्धेच्या शुभारंभी पर्वाचे अजिंक्यपद प्राप्त केले. जुने गोवे येथील कदंबा पठारावरील फुटसाल मैदानावर ही स्पर्धा खेळविण्यात आली.

उपांत्य फेरीत प्रुडंट मीडियाने प्राईम मीडियाचा तर स्पोर्ट्स बल्कावने एआयआर-डीडीचा पराभव करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. विजेत्या व उपविजेत्या संघांना रोख बक्षीस व आकर्षक चषक प्राप्त झाला. उत्कृष्ट गोलरक्षक - क्लाइव अल्वारिस (प्रुडंट मीडिया), अंतिम सामनावीर - वॉरेल डिसोझा (स्पोर्टस् बल्काव), स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू - ड्रेक डायस (स्पोर्ट्स बल्काव), उत्कृष्ट व्हेटरन्स खेळाडू - किशोर कामत (नवहिन्द पब्लिकेशन्स) यांची वैयक्तिक बक्षिसांसाठी निवड झाली.

बक्षीस वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सांताक्रुझचे आमदार रुदोल्फ फर्नांडिस व सन्माननीय अतिथी म्हणून समाज कार्यकर्ते आर्कांजो आरावजो आणि सावियो कोर्दो नानी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गोवा क्रीडा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष महेश गावकर, सचिव धीरज महांबरे, खजिनदार अनिरुद्ध राऊळ आणि संतोष कुबल यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेत प्राइम मीडिया, गोवा ३६५, प्रुडंट मीडिया, स्पोर्टस् बल्काव, नवहिंद टाइम्स, एआयआर-डीडी, भांगरभूय, टाइम्स ऑफ इंडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया आदी संघांनी सहभाग घेतला.

जुने गोवे : विजेत्या स्पोर्ट्स बल्काव संघासमवेत आमदार रुदोल्फ फर्नांडिस, आर्कांजो आरावजो, सावियो कोर्दो नानी, एसजेएजीचे अध्यक्ष महेश गावकर व अन्य.

दुर्वांकुरच्या गाव मर्यादित नाट्यस्पर्धेचे उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १२ : येथील दुर्वांकुर कला केंद्र,आयोजित हरमल गाव मर्यादित ८ व्या नाट्य स्पर्धेचे उद्घाटन नुकतेच खालचावाडा श्री नारायण देव मंदिर प्रांगणात करण्यात आले. या नाट्य स्पर्धेतील पहिले नाटक, क्षत्रिय मराठा समाज हौशी तरुण नाट्य मंडळातर्फे, मुरारी जिवाजी लिखित संगीत तारिले अभंग इंद्रायणीने सादर केले. यंदाची स्पर्धा जीप सदस्य रंगनाथ कलशवकर, सामाजिक कार्यकर्ते दिलीप वायंगणकर व अमित नाईक यांनी पुरस्कृत केली.

उद्घाटन समारंभात संस्थेचे अध्यक्ष चंद्रहास दाभोलकर यांनी आढावा घेतला. गेल्या सात वर्षातील स्पर्धांचा निकाल हा अनुरूप होता. नाटकाचा दर्जा वाढताना, कलाकारांना प्रोत्साहन व उत्तेजन मिळावे या हेतूने स्पर्धेचे आयोजन केले जाते. या गावात दरवर्षी उत्सवात १२- १३ नाटके होत असतात, त्या नाटकातील कलाकारांना हेरून या स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती अध्यक्ष दाभोलकर यांनी दिली.

यंदाच्या स्पर्धेत स्थानिक दिग्दर्शकांसाठी दोन बक्षिसे तसेच अभिनय पुरुष, स्थानिक स्त्री कलाकार व अन्य बक्षिसे रोख, प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह ठेवण्यात आली आहेत. या उद्घाटन सोहळ्यास परीक्षक प्रमोद मांद्रेकर व मनोहर पोखरे तसेच नाट्य मंडळाचे गजानन तारी उपस्थित होते. संस्थेचे सचिव अर्जुन गडेकर, उपाध्यक्ष प्रकाश नाईक रामजी व सदस्य विजय बर्डे यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन व आभार दत्ताराम ठाकूर यांनी मानले.

विवेकानंद ज्ञान मंदिर हायस्कूलला कबड्डी स्पर्धेचे उपविजेतेपद

केरी- सत्तरी : कबड्डी स्पर्धेत उप विजेतेपद पटकावलेल्या विवेकानंद ज्ञान मंदिर हायस्कूलच्या मुलींच्या संघासोबत विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक गोपीनाथ गावस,ज्येष्ठ शिक्षिका सिंथिया फर्नांडिस,प्रशिक्षक संजना गावकर व शारीरिक शिक्षक संदेश केसरकर.

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. १३ : गोवा सरकारच्या क्रीडा व युवा व्यवहार खात्यातर्फे आयोजित केलेल्या अखिल गोवा पातळीवरील १४ वर्षांखालील मुलींच्या गटातील कबड्डी स्पर्धेचे उपविजेतेपद केरी-सत्तरी येथील विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद ज्ञान मंदिर हायस्कूलच्या संघाने प्राप्त केले. सदर स्पर्धा पेडे म्हापसा येथे खेळविण्यात आली होती. गटाच्या कप्तान राजवी नाईक हिच्या नेतृत्वाखाली वैष्णवी सावंत, अंजली निलजकर, दिशा गावकर, श्रुष्टी गावस, सान्वी गावस, अवनी गावकर, समृद्धी गावस, संस्कृती गावस, गौरीशा गावस, साईशा गावस व गिरिजा गाड यांनी भाग घेतला.

कबड्डीच्या प्रशिक्षक संजना गावकर व शारीरिक शिक्षक संदेश केसरकर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे शिक्षण संस्थेतर्फे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पालक वर्गाकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

शांतादुर्गा शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १३ : डिचोली येथील विद्यावर्धक मंडळ संचलित श्री शांतादुर्गा प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. डिचोली नगरपालिकेचे अध्यक्ष विजयकुमार नाटेकर याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासमवेत विद्यावर्धक मंडळाचे अध्यक्ष विजय सरदेसाई,उपाध्यक्ष सदाशिव वालावलीकर, सचिव तथा क्रीडासंकुल व्यवस्थापक अभिजीत नोडा तेली, खजिनदार तथा हायस्कूल व्यवस्थापक राजेश धोंड, सदस्य अरुण साळकर शिशुवाटिका व्यवस्थापक डॉ.कौस्तुभ पाटणेकर, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष केदार शिरगांवकर, नगरसेविका रंजना वायंगणकर,प्राथमिक विभाग शिक्षिका प्रमुख सुविद्या गणपुले, हायस्कूलच्या सहमुख्याध्यापिका यास्मिन शेट्ये आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. डिचोली नगरपालिका क्षेत्र सर्वार्थाने प्लास्टिकमुक्त करण्याच्या गरजेवर श्रीयुत नाटेकर यांनी भर दिला व त्याकरिता सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

पेडणे :विविध स्पर्धातील विजेत्यांसमावेत मुख्याध्यापक यदुनंद देसाई, दिलीप हरमलकर, मार्गदर्शक शिक्षिका अर्विशा पेटकर.

आगरवाडा माध्यमिक विद्यालयाचे विविध स्पर्धांत घवघवीत यश

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १२ : जागतिक गणित दिवसाच्या निमित्ताने विद्या प्रसारक हायस्कूल मोरजी यांनी आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये जे. ए. चोपडेकर मेमोरियल सरकारी माध्यमिक विद्यालय आगरवाडा पेडणेच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. प्रेम प्रशांत बगळी आणि साईराज घाटवळ यांनी प्रश्नमंजूषा स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. विशेष कला सादरीकरण स्पर्धेमध्ये संस्कृती सुदन नाईक आणि नंदिनी नाईक यांना तृतीय उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले तर प्रतिकृती तयार करण्याच्या स्पर्धेत तृतीय उत्तेजनार्थ पारितोषिक साई लिंगुडकर आणि रौनक पोखरे यांना प्राप्त झाले. या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षिका अर्विशा पेटकर यांनी मार्गदर्शन केले होते. विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक यदुनंद नाईक देसाई, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष अविनाश गावकर तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिपाली लिंगुडकर यांनी विशेष अभिनंदन केले.

आफ्रिदीसह तीन पाकिस्तानी खेळाडूंना दंड

कराची, दि. १३ : पाकिस्तान क्रिकेट संघातील तीन खेळाडूंवर आयसीसीने मोठी कारवाई केली आहे. तिरंगी मालिकेत पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना खेळवण्यात आला. या सामन्यात आयसीसीच्या आचारसंहितेच्या लेव्हल १ चे उल्लंघन केल्याबद्दल तीन खेळाडूंना दंड ठोठावण्यात आला आहे. या तीन खेळाडूंमध्ये शाहीन आफ्रिदी, सौद शकील आणि कामरान गुलाम यांचा समावेश आहे.

वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीला संहितेच्या कलम २.१२ चे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. याशिवाय, कामरान गुलाम आणि सौद शकील यांना संहितेच्या कलम २.५ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळले आहे. दोघांकडूनही मॅच फीच्या १० टक्के रक्कम कापण्यात आली आहे.

पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळल्या गेलेल्या तिरंगी मालिकेतील तिसऱ्या सामन्याच्या २८ व्या षटकात शाहीन आफ्रिदी आणि मॅथ्यू ब्रिट्झके यांच्यात जोरदार वाद झाला. आफ्रिदीचा संयम सुटला आणि तो मॅथ्यूशी वाद घालायला गेला. यानंतर, पुढच्या चेंडूवर, जेव्हा मॅथ्यू ब्रीट्झके एक धाव घेत होता. तेव्हा या काळात आफ्रिदीने त्याला मुद्दाम अडवण्याचा प्रयत्न केला होता. दोन्ही खेळाडूंमध्ये शारीरिक संपर्क आणि जोरदार वाद झाला.

स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी जीवनात बदल शक्य : स्वामी आर्यानंद

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. १३ : तुम्ही दुसऱ्याचे चांगले केले तर तुमचे कल्याणच होणार.चांगल्या कामाची चांगलीच फळे मिळतात.प्रत्येकाकडे शक्ती असते.स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी जीवन बदलू शकते.आपण आपले मन विखरू द्यायचे नाही तर एकाग्र करायचे. आपण चांगल्या गोष्टी आत्मसात करायला पाहिजेत, असे उद्गार रामकृष्ण मिशन गोवाचे प्रमुख स्वामी आर्यानंद यांनी काढले.

केरी-सत्तरी येथील विवेकानंद स्मृती संघ संचालित विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस, विवेकानंद ज्ञान मंदिर हायस्कूलचे प्रभारी मुख्याध्यापक गोपिनाथ गावस उपस्थित होते.

केरी-सत्तरी : येथील विवेकानंद शिक्षण संस्थेत आयोजित केलेल्या स्वामी आर्यानंद यांच्या व्याख्यानात सहभागी झालेल्यांसोबत स्वामी आर्यानंद, नामदेव गावस व इतर.

स्वामीजी म्हणाले की, आपले अनुकरण दुसरे करत असतात. त्यामुळे आपण चांगले काम केले पाहिजे. कॅमेऱ्याच्या लेन्सला धूळ असेल तर फोटो चांगला येऊच शकत नाही. त्याचप्रमाणे आपली दृष्टी चांगली नसेल तर विचार चांगले होऊ शकत नाही. यावेळी त्यांनी अनेक गोष्टी सांगून विचार पटवून दिले.

कार्यक्रमाला शिक्षण संस्थेचे सचिव शिवाजी गाड, व्यवस्थापक दिनेश माईणकर, केरी युथ क्लबचे अध्यक्ष विष्णू पारोडकर, नामदेव केरकर, सामाजिक कार्यकर्ते विश्वेश पोरोब, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी नामदेव गावस यांच्या हस्ते स्वामी आर्यानंद यांना भेटवस्तू प्रदान केली. यावेळी रामकृष्ण मिशनतर्फे आणलेल्या फिरत्या पुस्तक ग्रंथालयातून स्वामी विवेकानंदांवर आधारित अनेक पुस्तके खरेदी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास शेटकर यांनी केले तर राघोबा लवू पेडणेकर यांनी आभार मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 162 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .